। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. No.
L2/RNP/PPR/04/2021-2023


FACEBOOK/
MANDESHVARTA

सांगोला * जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे * रविवार दि.२६ एप्रिल २०२६ * पाने ४ * मूल्य १ रू * अंक १७ वा

## सांगोला तालुक्यात माण नदीत उन्हाळी आवर्तन; टेंभू-म्हैसाळ योजनेला गती

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश शेतकऱ्यांना दिलासा

सांगोला (प्रतिनिधी):- तीव्र उन्हाळ्यामुळे वाढलेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यासाठी महत्त्वाचा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी टेंभू-म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत माण नदीमध्ये उन्हाळी आवर्तन सोडण्याचे निर्देश दिले असून, त्यामुळे तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या संदर्भात काल झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत अधिकाऱ्यांनी सांगितले की, सांगोला तालुक्यातील क्रमांक ४ आणि ५ फाट्यामधूनही



लवकरच उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे. यासाठी पाणीउचल केंद्रांची कार्यक्षमता तपासणे, कालव्यांची दुरुस्ती, गळती रोखण्यासाठी उपाययोजना आणि पाणीवाहिन्यांची देखभाल या सर्व बाबींची पूर्तता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासनाने पाणीपुरवठा अखंड आणि नियोजित पद्धतीने करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. माण नदीत आवर्तन सोडल्याने नदीकाठच्या गावांतील विहिरी, बोअरवेल्स आणि इतर पाणीस्रोतांची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. परिणामी खरीपपूर्व शेतीकामांना गती मिळेल, तसेच जनावरांच्या पाण्याची टंचाई कमी होईल. विशेषतः दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. काही भागांत आधीच पाणीटंचाई तीव्र झाल्याने या आवर्तनाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, पाणीवाटपात कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाने कडक सूचना दिल्या आहेत. पाण्याचे समतोल व पारदर्शक वितरण, शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवणे, तसेच अनधिकृत पाणीउचल थांबवणे यावर भर देण्यात येणार आहे. स्थानिक स्तरावर देखरेख यंत्रणा सक्रिय ठेवून पाणीवाटपाचे काटेकोर नियोजन करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. शेतकऱ्यांनी ठिबक व तुषार सिंचनासारख्या पाण्याची बचत करणाऱ्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. टेंभू-म्हैसाळ योजनेच्या माध्यमातून सांगोला तालुक्यातील सिंचनक्षेत्रात वाढ करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असून, अशा उन्हाळी आवर्तनांमुळे या योजनेचा प्रत्यक्ष लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. आगामी काळात पाण्याच्या साठ्याची स्थिती लक्षात घेऊन आणखी आवर्तनांचे नियोजन करण्याबाबतही सकारात्मक संकेत बैठकीत देण्यात आले. या बैठकीत सांगोला तालुक्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सक्रिय सहभाग घेतला. तालुक्यातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी उन्हाळी आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत निर्णय घेतल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, स्थानिक पातळीवरही समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र आहे.

## जनगणना कार्यक्रमासाठी सांगोल्यात ४४५ प्रगणक व ७५ पर्यवेक्षकांची नियुक्ती

सांगोला : जनगणना कार्यक्रम २०२७ करिता सांगोला तालुका ग्रामीण भागासाठी एकूण ४०३ प्रगणक गट निश्चित करण्यात आले आहेत. त्यासाठी प्रत्येक गटाकरिता ४०३ प्रगणक व राखीव ४२ असे एकूण ४४५ प्रगणक, तसेच पर्यवेक्षक ६८ व राखीव ७ असे एकूण ७५ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार बाळुताई भागवत यांनी दिली. वरीलप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण सिंहगड कॉलेज, कमलापूर येथे सुरू असून, एकूण २०० प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण ३ दिवसीय सत्रामध्ये ४ डिजिटल क्लासरूममध्ये दिनांक ०१ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दिनांक २४ एप्रिल २०२६ ते ६ मे २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. सदर प्रशिक्षणासाठी एकूण ८ मास्टर ट्रेनर कार्यरत आहेत. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी मा. सुशांत बनसोडे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सोलापूर यांनी प्रशिक्षण स्थळी भेट देऊन प्रगणक व पर्यवेक्षकांना जनगणनेचे महत्त्व, अचूक माहिती संकलन आणि कामकाजाची पद्धत याबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान, प्रत्यक्ष घरयादी कार्यक्रम दिनांक १६ मे २०२६ पासून प्रथम फेरीमध्ये सुरू होणार आहे. नवीन तरतुदीनुसार नागरिकांना स्वगणना (ड्शश्रष एर्पीशीरींळेप) करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व नागरिकांनी स्वगणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगोला तालुक्यातील ५ ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर





सांगोला: ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता होती.सांगोला विधानसभा मतदारसंघातील गौडवाडी, बुद्धेहाळ, राजुरी, नाझरे आणि नराळे या पाच ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश मिळाले आहे. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व प्रशासकीय अधिकार्यांना गावचा कारभार पाहताना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या, यासाठी मतदार संघातील ५ ग्रामपंचायत कार्यालयांच्या नूतन इमारतीसाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मिळवून दिला आहे. मतदार संघाच्या सर्वांगिण विकासाला गती देवून, शासकीय कार्यालयांचा देखील विकास करण्यावर आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी भर दिला आहे. यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी अडचण दूर होवून, नागरिकांना सेवा मिळण्याची सुविधा निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री. जयकुमार गोरे यांच्या कडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गौडवाडी, बुद्धेहाळ, राजुरी, नाझरे आणि नराळे ग्रामपंचायतींना नविन इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर गोरे यांनी तत्काळ या ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गतनिधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

## वाढेगाव येथे बेकायदेशीर वाळू वाहतूक प्रकरणी गुन्हा दाखल

सांगोला : तालुक्यातील वाढेगाव येथे कोरडा नदी पात्रातून बेकायदेशीररीत्या वाळू उपसा करून वाहतूक केल्याप्रकरणी एका वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोना बाबासाहेब पाटील (वय ३७ वर्षे) यांनी फिर्याद दिली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास मौजे वाढेगाव येथील कोरडा नदी पात्रात आरोपी हा त्याच्या ताब्यातील सुमारे ४ लाख ७ हजार रुपये किमतीचे बिस्कीट रंगाचे अशोक लेलंड कंपनीचे नंबर खोडलेले वाहन वापरून अंदाजे एक ब्रास वाळू शासनाची कोणतीही रॉयल्टी न भरता व परवानगी न घेता बेकायदेशीररीत्या उपसा करून वाहतूक करताना आढळून आला.दरम्यान, पोलीस असल्याचा संशय येताच आरोपीने वाहन थांबवून घटनास्थळावरून पळ काढला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पुढील तपास पोहेकॉ.बनसोडे करीत आहेत.

## केजरीवालांना मोठा झटका! राघव चड्ढा यांच्यासह आपचे तीन राज्यसभा खासदार भाजपमध्ये सामील

दिल्ली:- राघव चड्ढा यांच्यासह तीन राज्यसभा खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या घटनेकडे 'आम आदमी पक्षा'साठी एक मोठा धक्का म्हणून पाहिले जात आहे. विशेष म्हणजे, राज्यसभा खासदार राघव चड्ढा, संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांनी पक्षाच्या मुख्यालयात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली. राज्यसभेतील 'आप'च्या एकूण खासदारांपैकी दोन-तृतीयांश खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा आपला इरादा स्पष्ट केला आहे.'आप'चे खासदार राघव चड्ढा यांनी म्हटले, मी पक्षाच्या कामकाजापासून स्वतःला अलिप्त का ठेवले होते, याचे खरे कारण मी आज तुमच्यासमोर उघड करत आहे. त्यांच्या गुन्ह्यांमध्ये मला सहभागी व्हायचे नव्हते. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये सामील होण्यास मी नकार दिला, म्हणूनच त्यांच्या मैत्रीसाठी मला 'अपात्र' मानले गेले. आमच्यासमोर केवळ दोनच पर्याय उरले होते: एकतर राजकारण सोडून द्यायचे आणि गेल्या १५-१६ वर्षांपासून आम्ही हाती घेतलेले जनकल्याणाचे काम थांबवायचे; किंवा आपली ऊर्जा आणि अनुभव सत्कारणी लावून सकारात्मक राजकारण करायचे. म्हणूनच, आम्ही म्हणजेच राज्यसभेतील 'आप'च्या दोन-तृतीयांश सदस्यांनी भारतीय संविधानात नमूद केलेल्या तरतुदींचा वापर करून भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

## उन्हाचा तडाखा वाढला, महिलेचा मृत्यू

अहिल्यानगर:- दिवसेंदिवस पारा वर जाताना दिसतोय. उन्हाच्या झळांमुळे लोकांच्या अंगाची काहीली होत आहे. मुंबईसारख्या शहरात तर घामाने अंग भिजून निघत आहे. मराठवाडा, विदर्भात तर पारा थेट ४० अंस सेल्सिअसच्याही पुढे पोहोचला आहे. याच उन्हाने आता अहिल्यानगरात एक बळी घेतला आहे. येथे उष्माघातामुळे एका ५० वर्षीय व्यक्तीचे निधन झाले आहे. तर वाढते उन लक्षात घेऊन भंडारा, वर्धा जिल्ह्यात शाळांची वेळ बदलण्यात आली आहे. तर गोंदिया जिल्ह्यातही उष्णतेचा तडाखा पाहायला मिळत आहे. अहिल्यानगरच्या पारनेर तालुक्यातील गारगुंडी येथील प्राथमिक शिक्षिका उषा फापाळे (वय ५०) यांचे उष्माघातामुळे निधन झाले आहे. प्रखर उन्हात प्रवास केल्यानंतर त्यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचीही माहिती आहे. उपचारासाठी नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला आहे.

## संपादकीय......

# समावेशकतेचा गैरअर्थ

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे आणि या विविधतेचा पाया हिंदू समाजाच्या सहिष्णुता व सर्वसमावेशकतेत आहे. बहुसंख्य हिंदू समाज सहिष्णू व सर्वसमावेशक आहे. ही सर्वसमावेशकता इथल्या मातीत, विचारात आणि संस्कृतीत रुजलेली आहे. इतकी परकीय आक्रमणे झाली, अनेक जाती – धर्मांचे लोक इथे आले, त्या सगळ्यांना इथे सामावून घेतले. पारसी, ख्रिश्चन, अगदी मुस्लीम आदी सगळ्यांना सामावून घेतले आहे. त्यामुळेच भारतात विविधतेत एकता दिसून येते; मात्र सध्या अभिव्यक्तीच्या नावाखाली धार्मिक तुष्टीकरणाचा प्रयत्न होत असल्याचा आरोप 'लेन्सकार्ट''सारख्या घटनांमधून समोर येत आहे. कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी काही मार्गदर्शक सूचना केल्या होत्या. त्यामध्ये हिजाब, पगडी यांना परवानगी; मात्र टिकली, टिळा यांसारख्या हिंदू प्रतीकांवर निर्बंध असल्याचा दावा समोर आल्यानंतर समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. कंपनीने नंतर स्पष्टीकरण दिले असले, तरी तो मुद्दा थेट धार्मिक समानतेच्या भावनेशी जोडला गेला आहे. या वादविवादामुळे कंपनीच्या समभागांत मोठी घसरण पाहायला मिळाली. कंपनीचा शेअर सुमारे ५ टक्क्यांनी खाली आला. गुंतवणूकदारांच्या विश्वासार्हतेवर याचा नकारात्मक परिणाम झाला. विविध अहवालांनुसार, या वादामुळे कंपनीच्या बाजारमूल्यात मोठी घट झाली आहे. अवघ्या ५ दिवसांत कंपनीचे बाजार मूल्य हजारो कोटी रुपयांनी कमी झाले आहे. आर्थिक नुकसानीपेक्षाही कंपनीच्या सामाजिक प्रतिमेला बसलेला फटका अधिक मोठा आहे. प्रसारमाध्यमांमध्ये या विषयावर चर्चा झाली. संतापलेल्या ग्राहकांनी प्रत्यक्ष कृती करत खरेदी केलेले चष्मे तोडून निषेध व्यक्त केला. कंपनीच्या नवीन ऑर्डर मोठ्या प्रमाणात रद्द झाल्या.

सध्या चर्चेत असलेले 'लेन्सकार्ट' प्रकरण आणि 'तनिष्क' जाहिरात वाद – या दोन घटनांमध्ये काही वर्षांचे अंतर असले, तरी त्या दोन्हींच्या केंद्रस्थानी असलेला प्रश्न मात्र तोच आहे, तटस्थता आणि समानतेचा नेमका अर्थ काय? चार-पाच वर्षांपूर्वी घडलेली तनिष्कची घटना आणि आज समोर आलेले 'लेन्सकार्ट' प्रकरण या दोन्हींकडे एकत्रितपणे पाहिले, तर समाजातील बदलती मानसिकता आणि वाढती जागरूकता स्पष्टपणे दिसून येते. चार – पाच वर्षांपूर्वी, तनिष्कच्या जाहिरातीने मोठा वाद निर्माण निर्माण झाला होता. त्या जाहिरातीत आंतरधर्मीय विवाहाचे चित्रण होते. अनेकांनी या जाहिरातीचे स्वागत केले, कारण ती आधुनिक आणि प्रगतिशील विचार मांडणारी वाटत होती; मात्र, समाजातील एका मोठ्या वर्गाला जाहिरातीमधील सादरीकरणात एकतर्फीपणा जाणवला. त्यांच्या मते, अशा प्रकारच्या सादरीकरणातून विशिष्ट धार्मिक-सांस्कृतिक दृष्टिकोनाला अधिक महत्त्व दिले जात होते. ऋमाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर विरोध झाल्यानंतर अखेर कंपनीला ती जाहिरात मागे घ्यावी लागली.

या घटनेनंतर काही काळ गेला, पण त्यातून निर्माण झालेले प्रश्न कायम राहिले. आता, वर्तमान काळात 'लेन्सकार्ट' प्रकरणाने तेच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणले आहेत. कंपनीच्याअंतर्गत धोरणाने समाजात धार्मिक तेढ निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली. कंपनीने याबाबत स्पष्टीकरण दिले असले, तरी समाजातील प्रतिक्रिया तत्काळ उमटली. वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर लेन्सकार्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीयूष बन्सल यांनी स्वतः भूमिका स्पष्ट केली.


जुने वर्ष ४३ वे अंक २६ वा


# बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा ऐतिहासिक निर्णय!

## खेळाच्या अनेक नियमांमध्ये बदल

बॅडमिंटनचे सामने आता ३१३ पद्धतीऐवजी १५३ गुणपद्धतीनुसार खेळले जातील. सामने आता तीन २१२१ गेम्सऐवजी तीन १५१५ गेम्समध्ये खेळले जाणार आहेत. डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे झालेल्या बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या नवीन गुणपद्धतीला प्रचंड बहुमताने मंजुरी देण्यात आली. सभेत सादर केलेला प्रस्ताव १९८-४३ मतांनी मंजूर झाला. ही नवीन पद्धत ४ जानेवारी २०२७ पासून लागू होणार आहे.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा युक्तिवाद आहे की, या नवीन पद्धतीमुळे खेळात लवकरच उच्च-दबावाच्या हालचाली निर्माण होतील आणि खेळातील रोमांच वाढेल. बॅडमिंटनमध्ये सध्याचा २१-पॉइंट प्रकार २००६ मध्ये सुरू करण्यात आला होता. या प्रकारानुसार, सामने सातत्याने ४५ ते १०० मिनिटांपर्यंत लांबत होते, ज्यामुळे प्रसारक नाराज झाले होते. त्यांनी मागणी केली की सर्व पाच विभागांतील (पुरुष आणि महिला एकेरी, दुहेरी आणि मिश्र) सामने तीन तासांच्या आत पूर्ण केले जावेत. बीडब्ल्यूएफच्या अध्यक्षा खुनयिंग पटमा लीसावडट्रकुल म्हणाल्या की, हा निर्णय बॅडमिंटनच्या भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

झींपक्षरल घळपसी : पंजाबचा दिल्ली विरुद्धच्या सामन्यात ऐतिहासिक विजय, सर्वात मोठ्या धावसंख्येचा केला यशस्वी पाठलाग

नवी दिल्ली : पंजाब किंग्सने शनिवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध ६ गडी राखून विजय मिळवत आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग (रन ...

आम्ही पुढच्या पिढीसाठी एक खेळ तयार करत आहोत आणि आम्ही आमच्या खेळाडूंच्या दीर्घकालीन भविष्यात गुंतवणूक करत राहू. ३१५ गुणपद्धतीचा उद्देश बॅडमिंटनला अधिक रोमांचक आणि स्पर्धात्मक बनवणे, वेळापत्रकात सुधारणा करणे, सामन्याच्या वेळेत अधिक एकसमानता आणणे आणि खेळाडूंचे आरोग्य व पुनर्वसनासाठी संभाव्य फायदे प्रदान करणे हा आहे, असे लीसावडट्रकुल यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

जागतिक संस्थेने सांगितले की, सदस्य आणि हितधारकांशी चाचणी, विश्लेषण आणि सल्लामसलत करण्याच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर हा निर्णय घेण्यात आला. हे खेळाडूंच्या आरोग्याप्रती असलेल्या वचनबद्धतेतून आणि खेळाडूंना अधिक दीर्घ व यशस्वी कारकीर्द घडवण्यासाठी मदत करण्याच्या हेतूने प्रेरित, बीडब्ल्यूएफ सदस्यांचे सामूहिक मत दर्शवते.

हे प्रमुख बदल असतील:

खेळाच्या मध्यातला ६० सेकंदांचा ब्रेक आता ११ व्या पॉईंटऐवजी ८ व्या पॉईंटवर असेल.

दोन गेम्समधील ब्रेक १२० सेकंदांचा असेल.

१५ पॉईंट्सवर पोहोचल्यावर खेळाडूला दोन पॉईंट्सची आघाडी कायम ठेवावी लागेल.

जास्तीत जास्त पॉईंटची मर्यादा आता ३०-२९ ऐवजी २१-२० असेल.

## मनुष्य जन्म

आपण सध्या प्रबोधनासाठी घेतलेला विषय म्हटला तर अत्यंत कठीण आहे. म्हटले तर खूप सोप्पा आहे. तो म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे, म्हणजेच अज्ञानाकडून ज्ञानाकडे जायचे आहे. म्हणूनच हा विषय आपण निराळ्या प्रकारे वेगवेगळ्या अंगाने पाहत आहोत. म्हणजेच संचित, प्रारब्ध, क्रियमाण या संकल्पनांतून. ह्या शब्दांचे नेमके अपेक्षित अर्थ आपल्याला समजत नाहीत, म्हणून आपल्याला जीवन सुखावह करता येत नाही, समृद्ध करता येत नाही, यशस्वी करता येत नाही. मी मागल्या खेपेस सांगितले, इथे कुठेही अंधश्रद्धा नाही. पण काही गोष्टी अशा आहेत की त्या प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नाही. तुम्हाला भूक लागली तर ती प्रयोगशाळेत सिद्ध करता येते का? पोटात कळा येऊ लागल्या तर त्या प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नाही. सर्वच गोष्टी प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नाही. संचित घेऊन माणूस जन्माला येतो हे प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नसले तरी त्याला अनुमान प्रमाण आहे. अनुभव प्रमाण आहे.

## व्यंगचित्रे




## सुविचार

**आयुष्यात कोणतीही गोष्ट मिळवायची असल्यास वेळ लागतोच, म्हणून संयम बाळगणे आवश्यक आहे.**

### धर्म

# सौंदर्यलहरी भाष्य

आदि शंकराचार्यांनी 'सौंदर्यलहरी'मध्ये जगन्मातेच्या स्वरूपाचे जे वर्णन केले आहे, ते केवळ काव्यात्म नसून ते 'शाक्त' उपासनेचे दर्शन आहे. हे दर्शन अत्यंत गुह्य अशी तंत्र-सूत्रे आणि त्यामागील आध्यात्मिक रहस्य, यांचा समसमा संयोग आहे. १३व्या श्लोकात शंकराचार्य देवीच्या कटाक्षाचे अर्थात, साधकावर पडणार्या ओझरत्या दृष्टिक्षेपाचे वर्णन करत आहेत. हे वाचताना प्रथमदर्शनी एखाद्या श्रृंगारिक काव्याचा भास होतो. परंतु, या श्लोकाच्या आत 'शाक्त' उपासनेचा गाभा असणारे, एक अत्यंत गहन आध्यात्मिक सत्य दडलेले आहे.

आचार्य म्हणतात, हे माते, तू एखाद्या निस्तेज, बुद्धीने जड आणि आकर्षणहीन वृद्ध पुरुषावर नेत्रकटाक्ष टाकण्याचे फळ अद्भुत आहे. तुझ्या केवळ कृपाकटाक्षाचे सामर्थ्य असे आहे की, शेकडो तरुण स्त्रिया त्याच्यावर अनुरक्त होतात. त्याच्या समीप जाण्यासाठी त्या धावत सुटतात. त्या इतया भावविव्हळ झालेल्या असतात की, आपल्या वेण्या सुटत आहेत, आपली चोळी उन्मुक्त होते आहे, आपला कमरपट्टा गळून पडतो आहे याचेसुद्धा त्यांना भान उरत नाही. या श्लोकाला वाचल्यावर प्रथमतः हाच समज होतो की, हा श्लोक स्त्रीला वश करण्यासाठी अर्थात, वशीकरण हेतूने लिहिला आहे का? परंतु, याचा गुह्य अर्थ अत्यंत वेगळा आहे.

शाक्त-परंपरेत देवीचा कृपाकटाक्ष म्हणजे, केवळ आपल्या अबोध साधकाकडे मातृभावाने, प्रेमाने बघणे नाही. देवीचा कृपाकटाक्ष हाच एक 'शक्तिपात' विधी आहे. या कटाक्षाच्या माध्यमातून, शक्तीच्या कृपेचा चैतन्यप्रवाह देवीकडून साधकाकडे प्रवाहित होतो. जेव्हा जगन्माता एखाद्यावर प्रसन्न होते, तेव्हा तिची त्याच्यावर दृष्टी पडते आणि त्या कटाक्षाने त्या व्यक्तीचे संपूर्ण अस्तित्वच बदलून जाते. हा कटाक्ष एका दृष्टीने गुरुकृपेचे, शक्तिपाताचे प्रतीक आहे. तंत्रशास्त्रात याला 'अपाङ्गकृपा' असे म्हटले जाते. ही दृष्टी साधकाची सुप्त चेतना केवळ जागृतच करत नाही, तर त्या चेतनेला ऊर्ध्वगामी करून त्याला जीवन्मुक्त करू शकते.या श्लोकाचा गुह्यभाग जाणून घेण्यासाठी, शाब्दिक प्रतीके आणि त्यामागील गहन विचार या स्वरूपात विश्लेषण करणे आवश्यक आहे. शेकडो तरुण स्त्रिया त्याच्यामागे धावतात, याचा गुह्य अर्थ फार वेगळा आहे. शाक्तदर्शनात स्त्री हे शक्तीचे प्रतीक आहे. या शेकडो युवती म्हणजे, सृष्टीतील समस्त शक्ती- पंचमहाभूते, त्रिगुण, दश महाविद्या, चौसष्ट कला; या सर्व जणू त्या साधकाच्या दिशेने ओढल्या जातात. ज्याच्यावर देवीची कृपादृष्टी आहे, निसर्ग त्याची सेवा करतो, परिस्थिती त्याच्या अनुकूल होते. संधी त्याच्याकडे आपोआप येतात. हे सारे देवीच्या कटाक्षाचे फलित आहे.


साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासः डॉ.अमित रुपनर

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून फॅबटेक विद्यार्थ्यांचे श्रमदान

सांगोला(प्रतिनिधी):महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दुःखाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्ती पर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालय सांगोला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी



गुरुवार दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी वासुद (ता. सांगोला) येथे जाऊन श्रमदान शिबिराच्या माध्यमातून वृक्षारोपण व वृक्ष संगोपन उपक्रमात राबविला असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ. अमित रूपनर यांनी दिली. फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभाग शिक्षण घेत असलेल्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी वासुद गावात जाऊन गावातील स्वच्छता, वृक्षारोपण व वृक्षसंगोपन उपक्रम राबवून गावातील नागरीकांना स्वच्छतेचा संदेश दिला. या उपक्रमामुळे गावातील लोकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. लोकांमुळे स्वच्छ व सुंदर गाव निर्माण झाले असून फॅबटेक विद्यार्थ्यांच्या श्रमदान शिबिरातून ग्रामविकासाला चालणा मिळाल्याची भावना यादरम्यान ग्रामस्थांनी समारोप प्रसंगी व्यक्ती केली. राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपक्रमशील उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, स्टुडंट डिन डॉ. संजय पवार, प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. ज्योती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी वासुद येथील कृषी अधिकारी बाळासाहेब सावंत, ग्रामपंचायत अधिकारी, विद्यमान सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पिकांची पाण्याची गरज समजून घ्या-कृषिभूषण अंकुश पडवळे



सोलापूर – शेतकऱ्यांनी जागरूक होऊन आपल्या शेतातील पिकाची पाण्याची गरज समजून घेतल्यास आपण पाण्यामध्ये पन्नास ते सत्तर टक्के पर्यंत बचत करू शकतो असे मत कृषिभूषण अंकुश पडवळे यांनी व्यक्त केले. जलसंपदा विभाग, पुणे, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सोलापूर व भीमा विकास विभाग क्रमांक दोन च्या वतीने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून पडवळे यांनी वरील विचार व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सोलापूरचे अधीक्षक अभियंता सुविरवेंद्र खांड`कर, कार्यकारी अभियंता प्रशांत कडु स्कर, कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड, निवृत्त अभियंता संभाजी गरड, उपअभियंता फरीद मुजावर, कृषी अधिकारी शुभम पाचपिले आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रम आय. एम. ए. हॉल, डफरीन, चौक सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेला होता. पुढ` बोलताना पडवळे म्हणाले की, प्रत्येक पिकाची पाण्याची गरज वेगवेगळी असते ऊसाला एकरी पाण्याची गरज अठरा ते बावीस लाख लिटर, मका पिकासाठी सहा ते आठ लाख, केळी पिकासाठी पंचवीस ते तीस लाख, डाळिंब पिकासाठी आठ ते बारा लाख, द्राक्ष पिकासाठी दहा ते पंधरा लाख, कारले दोडके भाजीपाल्यासाठी चार ते सहा लाख, रंगीत ढोबळी मिरचीसाठी आठ ते बारा लाख लिटर पाण्याची गरज असते आपण वरील सर्व पिकांना साठ ते सत्तर टक्के पाणी जादा वापर करून पाण्याचा अतिरेकी वापर करत आहे. यामुळे जमिनी खराब होऊन जमिनीची उत्पादकता कमी होत आहे, पिकाची गुणवत्ता कमी होऊन पिकाचे टनेज कमी होत आहे. व पाण्याचे मूल्य ही घसरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुढील काळात डोळसपणे ठिबक सिंचनाचा वापर करून पिकांना गरजे इतके पाणी देण्यासाठी गांभीर्याने काम करणे गरजेचे आहे. तरच आपण शेतीमधून शाश्वत उत्पन्न मिळवून शेतीला प्रतिष्ठा मिळवून देऊ शकतो अन्यथा पुढील काळात शेतीचे भवितव्य अंधकारमय होईल अशी भीती पडवळे यांनी व्यक्त केली. जमिनी चोपण व कडक होत आहेत सेंद्रिय खतांचे प्रमाण शेतकऱ्यांनी कमी केल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे. तरी शेतकऱ्यांनी पुढील काळात दोन पिकांमध्ये हिरवळीचे खत म्हणून ताग व धेंचा या हिरवळीच्या खताचा वापर करून जमिनीची उत्पादकता वाढवण्यासाठी व जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही शेवटी पडवळे यांनी सांगितले..

## सराफ सुवर्णकार असोसिएशन कडून आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व तहसीलदार यांना निवेदन



सांगोला: अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सराफ बांधवांचे अपहरण, अमानुष मारहाण, बेकायदेशीर रिकव्हरी व खंडणी उकळल्याच्या गंभीर प्रकरणातील दोषींना कायमस्वरूपी नोकरीवरून बडतर्फ करावे तसेच त्यांच्या मालमत्तेची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी सराफ सुवर्णकार असोसिएशन सांगोला तालुका, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विद्यमान आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व तहसीलदार बाळूताई भागवत यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात सराफ सुवर्णकार व संलग्न कारागीर व्यावसायिक बांधवांनी अत्यंत गंभीर व संतापजनक घटनेची दखल घेत कारवाईची मागणी केली आहे. लोकशाहीचा रक्षक असलेल्या पोलीस प्रशासनाने दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी कायद्याचे रक्षक नव्हे तर भक्षक बनून जे कृत्य केले, ते महाराष्ट्राच्या पोलीस परंपरेला काळिमा फासणारे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित दोषींवर तात्काळ व कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी तुमच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी निश्चितच चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी सकारात्मक प्रतिक्रिया दिली. सराफ सुवर्णकार व संलग्न कारागीर समाज हा शांतताप्रिय व कायद्याचा सन्मान करणारा, तसेच देशात सर्वाधिक कर भरणारा प्रामाणिक व्यावसायिक समाज आहे. मात्र या प्रकरणातील दोषींवर विनाविलंब कडक कारवाई झाली नाही, तर समस्त महाराष्ट्रातील सराफ सुवर्णकार व संलग्न कारागीर व्यावसायिक बांधव राज्यभर तीव्र आंदोलन, रास्ता रोको, बेमुदत उपोषण व बाजारपेठ बंद आंदोलन करतील. याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील, असा इशारा सराफ असोसिएशन सांगोला तालुका संघटने कडून देण्यात आला आहे. यावेळी सराफ सुवर्णकार संरक्षण समिती, महाराष्ट्र राज्य चे पदाधिकारी तसेच सराफ सुवर्णकार असोसिएशन सांगोला संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## फॅबटेक मध्ये कर्व्हज अँड ट्रान्सफॉर्मसः द लँग्वेज ऑफ मॅथेमॅटिक्स या विषयावर व्याख्यान

सांगोला (प्रतिनिधी):- फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभागात कर्व्हज अँड ट्रान्सफॉर्मस : द लँग्वेज ऑफ मॅथेमॅटिक्स या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान मोठ्या उत्साहात संपन्न झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे यांनी दिली. फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज मधील प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभागात आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानाचे व्याख्याते प्रा. प्रसाद जरे यांचे महाविद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. ज्योती शिंदे यांनी केले. दरम्यान कर्व्हज अँड ट्रान्सफॉर्मस : द लँग्वेज ऑफ मॅथेमॅटिक्स या विषयावर बोलताना प्रा. प्रसाद जरे म्हणाले, अभियांत्रिकी समस्या समजून घेण्यासाठी आणि सोडवण्यासाठी आवश्यक साधने म्हणून वक्र आणि गणितीय रूपांतरणांच्या मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना उपयोगी ठरतात. या व्याख्यानात विविध प्रकारचे वक्र, त्यांचे आलेखी अर्थ आणि वास्तविक जगातील घटना दर्शविण्यामधील त्यांचे उपयोग यांचा समावेश होता. तसेच, जटिल गणितीय मॉडेल्स सोपे करण्यासाठी, प्रणालींचे विश्लेषण करण्यासाठी आणि अवकल समीकरणे सोडवण्यासाठी फोरिअर रूपांतरणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. याशिवाय गणितीय तंत्रे अभियांत्रिकीमध्ये एक वैश्विक भाषा म्हणून कशी काम करते, ज्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये कार्यक्षम समस्या-निवारण, प्रणाली विश्लेषण आणि नवोपक्रम शक्य होतो. याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सुत्रसंचालन प्रा. खंडू शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. हरिदास पवार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रथम वर्ष इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

# उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा सन्मान सोहळा संपन्न

पंढरपूर : एकात्मिक बालविकास सेवा योजना, नागरी सोलापूर पश्चिम यांच्या वतीने दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच पोषण ट्रॅकरमध्ये अपार आयडी नोंदणी करून सन २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा सन्मान सोहळा योग भवन, डखउ ऑफिसजवळ, पंढरपूर येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय डॉ. संगीता पाटील या होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती शकुं तला नडगिरे मॅडम उपस्थित होत्या. बालविकास प्रकल्प अधिकारी मा. किरण जाधव, मुख्य सेविका सनगर मॅडम, जाधव मॅडम, पाटील मॅडम तसेच प्रकल्प समन्वयक कांबळे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर, करमाळा व माळशिरस या नागरी विभागातील अंगणवाडी सेविका व मदतनीस मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होत्या. नागरी प्रकल्पातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पंढरपूर येथील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी विशेष मेहनत घेतली. उपस्थित पाहुणे व अध्यक्षांनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्य सेविका सनगर मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मेडिअम स्कूलमध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

सांगोला (प्रतिनिधी):- जागतिक वारसा दिनाचे औचित्य साधून सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मेडिअम स्कूलमध्ये इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानामध्ये भर पडावी. तसेच त्यांना जागतिक वारसा स्थळांबद्दल माहिती व्हावी या दृष्टिकोनातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या सुरुवातीला विद्यालयातील विद्यार्थिनी कु.हेत्वी पटेल हिने जागतिक वारसा दिूच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. त्यानंतर विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उस्फुर्त असा प्रतिसाद नोंदवला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री.संतोष बेहरे व श्री.संगमेश्वर घोंगडे यांनी काम पाहिले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिल्पा ढाळे पर्यवेक्षिका कु.सुकेशनी नागटिळक तसेच कु.मीनाक्षी बिराजदार,कु. शुभांगी घार्गे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मेडशिंगीतील देशभक्त संभाजीराव शेंडे विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

मेडशिंगी (वार्ताहर):- मेडशिंगी (ता. सांगोला) येथील देशभक्त संभाजीराव शेंडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेण्यात येणाऱ्या एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत प्रशालेतील तीन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु. प्रज्योती प्रविण दिघे, कु.तनिष्का अमोल पवार, कु.आरती गणेश राऊत यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत शाळेचे व परिसराचे नाव उज्वल केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# उत्कर्ष पूर्व प्राथमिक विद्यालयाचे डायमंड टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश

सांगोला (प्रतिनिधी):- ऋग्वेद हेल्थ बारामती फाउंडेशन तर्फे घेण्यात आलेल्या डायमंड टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षेमध्ये उत्कर्ष पूर्व प्राथमिक विद्यालयाने पहिल्याच वेळी घवघवीत यश संपादन करून सुवर्णपदक पटकावून शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा खोवला आहे. या परीक्षेत एकूण ७२ विद्यार्थी बसले होते निकाल शंभर टक्के लागला असून त्यामध्ये सुवर्णपदक मिळालेले विद्यार्थी शिवन्या विकास इंगवले , अन्वी अभिजीत हजारे , पियुष सुरज रेड्डी तर अथर्व विजय कोळेकर प्रथम क्रमांक, जान्हवी किशोर नरळे-प्रथम विभागून, अद्वैतराज आशिषकुमार सोनवणे -उत्तेजनार्थ, शिवांशी भारत सोळगे- उत्तेजनार्थ यांनी स्पर्धेमध्ये घवघवीत यश प्राप्त केले . मुख्याध्यापिका मधुरा शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा घेण्यात आली. यामध्ये धनश्री सोनंदकर, शकीला खतीब, विद्या म्हेत्रे, सरस्वती सरोदे व शालन गयाळी यांनी मुलांना मार्गदर्शन केले. शाळेच्या अध्यक्षा नीलिमा कुलकर्णी,संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे प्राचार्य कुलकर्णी सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विश्रांती बनसोडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांनी मुलांचे अभिनंदन व कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पवार विरुद्ध पवार लढतीची आमची इच्छा नाही; आम्ही सर्व एकत्र राहावं अशी पवार कुटुंबाची भावना

पुणे : बारामतीत राजकीय वातावरण तापले असताना जय पवार यांनी माध्यमांशी संवाद साधत अनेक महत्त्वाचे संकेत दिले आहेत. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मतदानाचा अंदाज, उमेदवारीबाबतची भूमिका आणि कुटुंबातील एकतेचा मुद्दा स्पष्टपणे मांडले. जय पवार म्हणाले की, या निवडणुकीत सुमारे ६० टक्के मतदान होईल, असा अंदाज आहे. सकाळच्या वक्तव्याचा गैरसमज झाल्याचेही त्यांनी स्पष्ट करत, मी सकाळी जे बोललो त्याचा चुकीचा अर्थ लावला गेला, असे सांगितले. दरम्यान, मतदानाच्या टप्प्यांबाबतही त्यांनी निरीक्षण नोंदवले. सकाळी चांगलं मतदान झालं, दुपारी थोडी घट झाली, मात्र संध्याकाळी चारनंतर पुन्हा वाढ होत आहे, असे त्यांनी नमूद केले. माझं आणि युगेंद्र दादांचं बोलणं झालं. आमच्या दोघांचीच नाही तर पूर्ण पवार कुटुंबाची इच्छा आहे की, आम्ही सर्व एकत्र राहावं. २०२९ मध्ये पवार विरुद्ध पवार निवडणूक होणार असं रोहित दादा बोलले. पण तशी आमची इच्छा नाही, अशी प्रतिक्रिया जय पवार यांनी दिली. यावर पत्रकारांनी दोन्ही पक्ष एकत्र येणार का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी ते मी नाही सांगू शकत. त्याबाबत दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील, अशी प्रतिक्रिया जय पवार यांनी दिली.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी नियमित वाचा
साप्ताहिक माणदेश वार्ता

# स्वेरीत एमएचटी-सीईटी परीक्षा सुरळीत सुरु

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये एमएचटी-सीईटी २०२६ ही परीक्षा सुरळीतपणे सुरु असल्याचे चित्र दिसून येत आहे. या परीक्षेचे व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी संगणकांवर आधारित विविध तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित आणि पारदर्शक परीक्षा प्रणाली राबविण्यात येत आहे. यामुळे परीक्षार्थी व पालक वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र शासनातर्फे विविध अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेली एमएचटीसीईटी ही परीक्षा राज्यभर घेतली जात असून स्वेरीमध्ये दि. २५ मार्च २०२६ पासून ही परीक्षा सुरु झाली असून ती शासनाच्या संकेतस्थळावर दिलेल्या तारखांनुसार दि. १७ मे २०२६ पर्यंत चालणार आहे. यामध्ये तीन वर्ष व पाच वर्षांसाठी असलेले विधी अभ्यासक्रम (लॉ), इंजिनिअरिंग (पीसीएम), फार्मसी (पीसीबी), मास्टर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन्स (एमसीए) व बॅचलर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशंन्स (बीसीए) या अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेल्या एमएचटी-सीईटी येथे होत आहेत. कांही अभ्यासक्रमांसाठी सीईटी परीक्षा पूर्ण झाल्या आहेत तर कांही अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्याप सूरु आहेत. सदरची परीक्षा शासनाच्या वतीने स्वेरीमध्ये सुरळीतपणे सुरु असून शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच स्वेरीच्या वतीने संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. अंतोष द्याडे, प्रा.रोहित पोरे व संगणक तज्ञ प्राध्यापक वर्ग तसेच प्रा. उत्तम अनुसे, प्रा. पोपट आसबे, इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी हे परीक्षा नेहमीप्रमाणे सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# खासदार रवींद्र वायकर यांना शहीद अशोक कामटे संघटनेचे रेल्वे मागण्यांचे निवेदन

सांगोला (प्रतिनिधी):- सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने जोगेश्वरीचे (पूर्व) खासदार रवींद्र वायकर यांना रेल्वेच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. संघटनेचे पदाधिकारी सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक ( लोहमार्ग) हरी बाबर आलेगाव) यांनी समक्ष मुंबईतील कार्यालयात भेट देऊन निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. या निवेदनामध्ये ११०२७ ११०२८ दादर -सातारा-दादर रेल्वे दररोज सुरू करण्यात यावी, सांगोला-पंढरपूर- शेगाव (गजानन महाराज मंदिर) रेल्वे सेवा सुरू करावी त्यामुळे विदर्भातील पंढरी व पश्चिम महाराष्ट्रातील पंढरी याची संयुक्तीता वाढून भावी भक्तांचे सोय होईल, व दि २६ एप्रिल रोजी दादर येथे होणाऱ्या रेल्वे परिषदेचे निमंत्रणही देण्यात आल्याची माहिती संस्थापक निलकंठ शिंदे सर यांनी दिली. दिलेल्या निवेदनावर तत्काळ कार्यवाही करिता रेल्वे प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन खासदार रवींद्र वायकर यांनी अशोक कामटे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले. यावेळी अशोक कामटे संघटनेचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

# हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, उद्धवजी तुम्हीच लढा

मुंबई : महाविकास आघाडी विधानपरिषद निवडणुकीसाठी काँग्रेसनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा सुद्धा उद्धव ठाकरेंनी निवडणूक लढवावी यासाठीचा आग्रह धरला आहे. आज हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर भेट घेऊन काँग्रेसची भूमिका मांडली, काँग्रेसची सुद्धा भूमिका उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा विधानपरिषदेवर यावं अशी आहे. यासंदर्भात विजय वडेट्टीवार यांनी स्वत: ट्विट देखील केलं आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सुद्धा उद्धव ठाकरे यांनी विधान परिषद निवडणूक लढवावी अशा प्रकारची विनंती एक्स पोस्ट द्वारे केली आहे. त्यामुळे, उद्धव ठाकरे काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.